MHSO100000812015

**<u>वि.दि.दा.क्र.०६/२०१५ मधील नि.क्र.१८६ खालील आदेश.</u>**

वादींनी सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिताचे, क्रम–६, नियम–१७ व क्रम–२२, नियम–२ प्रमाणे वादी क्र.१अ पांडुरंग आण्णासाहेब देशमुख हे मयत झाल्यामुळे त्यांच्या नावासमोर मयत असे लिहिण्यास व त्यांचे नाव वादींचे शिर्षकामधून कमी करण्याबाबत दुरुस्तीसाठी परवानगी मिळण्यासाठी दाखल केला आहे. त्यांनी सदरच्या अर्जात कथन केले आहे की, वादी क्र.१अ पांडुरंग आण्णासाहेब देशमुख हे ता.२७.१२.२०२५ रोजी मयत झाले आहेत. वादी क्र.१अ पांडुरंग आण्णासाहेब देशमुख यांचे वारस अगोदरच दाव्यात वादी म्हणून समाविष्ठ आहेत. त्यामुळे वादी क्र.१अ चे नाव दाव्यातून व सरनाम्यातून कमी करण्यास व त्यांचे नावास कंस करण्यास परवानगी मिळणे आवश्यक आहे. म्हणून त्यांनी त्यांचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

२. सदरचे अर्जास प्रतिवादींनी जबाब दिलेला असून त्यामध्ये म्हटले आहे की, सदरचे अर्जास त्यांची हरकत असुन सदरचा अर्ज मुदतीत नाही व कायदेशीर सुध्दा नाही. त्यामुळे सदरचा अर्ज रद्द होण्यास पात्र आहे.

३. वर नमूद केलेल्या कथनांचा विचार करुन माझे विचारार्थ खालील मुद्दे आहेत व त्या मुद्दयावर मी माझे कारणांसह निष्कर्ष नोंदवित आहेः–

| अ.क्र. | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १. | सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे काय? | ... | होय. |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | आदेश काय? | ... | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्र.१ बाबतः–

४. मी वादींतर्फे विद्वान वकील श्री.नरुटे व प्रतिवादींतर्फे विद्वान वकील श्री.बर्गे यांचा युक्तिवाद ऐकला. तसेच सदरच्या प्रकरणांमधील संबंधीत दस्तऐवज पाहिले. वादी क्र.१अ हा ता.२७.१२.२०२५ रोजी मयत झाल्याचे दिसुन येते. वादी क्र.१अ यांचे वारस अगोदरच अभिलेखावर असल्याचे दिसुन येते. वादी क्र.१अ हा मयत झाल्यामुळे त्याच्या नावासमोर मयत लिहिण्यास व त्याचे नाव शिर्षकामधून कमी करण्यास परवानगी देणे आवश्यक आहे. सदरच्या दुरुस्तीमुळे त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. म्हणून मी मुद्दा क्र.१ चे उत्तर ''होकारार्थी'' नोंदवित आहे.

### मुद्दा क्र.२ बाबतः–

५. मी वर नमुद केल्याप्रमाणे सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. म्हणुन मी मुद्दा क्र.२ चे उत्तरासाठी खालील अंतिम आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

सदरचा नि.क्र.१८६ चा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by GHANWAT SOPAN DASHRATH
Date: 2026.02.18 10:28:12 +0530

दि.१७.०२.२०२६. (सोपान द.घनवट)
दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर,
माळशिरस.

**वि.दि.दा.क्र.०६/२०१५**

**नि.क्र.१८६ खालील**

शेरा

मी शपथेवर सांगते की, या पी.डी.एफ. आदेश फाईल मधील मजकूर हा मूळ आदेशातील मजकूराशी शब्द न शब्द सारखा आहे.

लघुलेखकाचे नाव–श्री.म.पां.सदाफुले.

न्यायालयाचे नाव–दि. न्या. व. स्तर, माळशिरस.

आदेश मजकूर सांगितल्याचा दि.१७.०२.२०२६.

आदेश टंकलिखित केलेला दि.१७.०२.२०२६.

आदेश स्वाक्षरित केल्याचा दि.१७.०२.२०२६.

आदेश अपलोड केल्याचा दि.१८.०२.२०२६.

स्वाक्षरित/–

(श्री.म.पां.सदाफुले )

लघुलेखक ग्रेड – २,

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,

माळशिरस.